8756

जा.क्र.नांवाशमनपा/आवस्ववि/औभां/ /२०११
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक :- 15/1/२०११.

# जाहिर निविदा

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अंतर्गत श्रीमती कस्तुरबा मातृसेवा केंद्र, शामनगर दवाखाना येथे राष्ट्रीय कुटूंब कल्याण शास्त्रक्रिया हा कार्यक्रम राबविण्यासाठी औषधी व सर्जिकल सहित्य खरेदीकरीता नामांकीत उत्पादक कंपन्या/प्राधिकृत वितरक व अधिकृत पुरवठादार यांचेकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निविदा पत्रके सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत प्रत्येकी **रु.१,०००/- (अक्षरी हजार रुपये फक्त-)** भरुन दिनांक 18/1/२०११ ते दिनांक 25/1/२०११ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत औषधी भांडार, संत रविदास मार्केट, इतवारा मनपा, नांदेड येथून प्राप्त करावी.

मोहरबंद निविदा दिनांक 27/1/२०११ दुपारी ०२.०० वाजेपर्यत मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य व स्वच्छता विभाग, गोकुळनगर, मनपा, नांदेड येथे स्विकारले जातील व प्राप्त निविदा शक्यतो त्याच दिवशी अथवा कार्यालयाचे सोईनुसार उपस्थित निविदा धारकासमोर निविदा उघडण्यात येतील.

१) निविदा पत्रिकेतील सर्व अटी व नियम निविदाधारकास बंधनकारक राहतील.
२) निविदाधारकाने प्रत्येकी दोन (२) लखोटे (लिफाफा) भरणे आवश्यक आहे. पहिल्या लिफाफात मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नावे **रु.४,०००/- (अक्षरी चार हजार रुपये फक्त-)** चे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा कॉल डिपॉझिट व प्राधिकृत वितरकाचे प्रमाणपत्र तसेच दुसरा लखोट्यात दरपत्रक असावे (प्राधिकृत वितरकाचे प्रमाणपत्र व कॉल डिपॉझिट असल्याशिवाय लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.)
३) निविदेतील दर सर्व करासहित ठळक अक्षरात असावीत व त्यावर खाडाखोड नसावी.
४) पुरवठा धारकांनी पुरवठा करावयाची औषधी व सर्जिकल साहित्य I.S.I./I.S.O./C.E. मार्क/ दर्जेदार व नामांकीत कंपनीकडून उत्पादीत केलेले असावे. तो ठरविण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.
५) पुरवठा धारकाचे नमुने मान्य झाल्यानंतर पुरवठाधारकांना पुरवठा करावयाचा आदेश देण्यात येईल. व तसेच त्यांनी ३० दिवसाच्या आत सर्व औषधी व सर्जिकल सहित्याचे पुरवठा करणे बंधनकारक राहील. या औषधीची व सहित्याची मुदत बाहयता व हमी एक वर्षावरील असावी.
६) सदर जाहिर निविदा सुचना महापालिकेचे वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. www.nwmcnanded.org
७) कोणतेही कारण न दर्शविता अंशत: किंवा पुर्णत: निविदा स्विकारणे किंवा रद्द करणे मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राहील.

सही/-
**आयुक्त**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**प्रतिलिपी माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१) मा.संपादक, दैनिक उर्दू नांदेड शेकट, नांदेड कळविण्यात येते की, दि.17/1/२०११ (उद्याच्या) अंकात वरील जाहिर निविदा सुचना बाराच्या (१२) फॉट मध्ये ठळकरीत्य दिसेल अशा रीतीने शासन दरानुसार प्रसिध्द करुन अंक व बिलाच्या दोन प्रतीसह या कार्यालयास सादर करावे.
२) मुख्य लेखा परिक्षक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
३) मुख्य लेखाधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
४) अंतर्गत लेखा विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
५) सिस्टम मॅनेजर, (संगणक कक्ष) नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.